# जाहिर लिलाव

रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ या संस्थेचे दुरुस्त न होणाऱ्या, निरुपयोगी निर्लेखित शासकीय वस्तू, उपकरणे फर्निचर हत्यारे अवजारे व इतर साहित्य यांचा जाहिर लिलाव दि २८/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेच्या आवारात आयोजित करण्यात येणार आहे. लिलावातील वस्तु पहाण्यासाठी दि. २५.०६.२०२५ ते २७/०६/२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते २.०० वाजेपर्यंत पहाण्यास मिळतील.

अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ९४०३९३०९४६

स्वा/-

सहआयुक्त पशुसवंर्धन रोग
अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७

Scanned with OKEN Scanner

# जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

१. जाहीर लिलावात भाग घेणारे यांनी रक्कम रुपये ५०००/- रोख भरावी व लिलावाची सर्वोच्च बोली झाल्यानंतर सदर बोलीस सक्षम प्राधिकारी यांची मान्यता प्राप्त होईपर्यंत सर्वोच्च बोली धारकाला रक्कम रु १९०००/- या कार्यालयात अनामत रक्कम ठेवावी लागेल भरावी लागेल. मंजूरी प्राप्त झाल्यास सदर रक्कम बोली रक्कमेत समाविष्ट करण्यात येईल व नामंजूर झाल्यास अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल

२. जाहीर लिलाव ज्यांचे नावे होईल ती व्यक्ती पार्टी सोडून इतरांची बयाना रक्कम लवकरात लवकर परत करण्यात येईल.

३. बयाणा रक्कम रोख स्वरुपात लिलावापूर्वी १ तास अगोदर जमा करावी लागेल.

४. बयाणा रक्कम भरलेल्यांनाच जाहीर लिलावात बोली बोलता येईल.

५. जाहीर लिलावात जास्तीत जास्त रक्कमेची बोली बोलताना रु.१०००/- च्या पटीत बोली बोलावी लागेल.

६. जाहीर लिलावात जास्तीत जास्त रक्कमेची बोली बोलणाऱ्यास लिलाव दिला जाईल.

७. यशस्वी जाहीर लिलावधारकाने बोलीची रक्कम तीन दिवसाचे आत या कार्यालयास धनाकर्षाने जमा करावी.

८. जाहीर लिलावातील वस्तू आहे त्या स्थितीत व आहेत तेथून स्वखर्चाने आठ दिवसाचे आत घेऊन जाव्यात.

९. जाहीर लिलावासंबंधी सर्व कार्यवाही या संस्थेच्या कार्यालयीन वेळेत केली जाईल.

१०. जाहीर लिलावाची लिलाव प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेचे अधिकार सहआयुक्त पशुसंवर्धन रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-०७ यांना असतील.

११. यशस्वी जाहीर लिलाव धारकाने अंतिम बोलीची रक्कम **Administrative Officer, to Joint Commissioner, DIS, Aundh, Pune**-०७ या नावे धनाकर्ष काढून जमा करावी.

१२. यशस्वी जाहीर लिलाव धारकास अंतिम बोली किमतीवर अधिक १८% सेवा व वस्तू कर भरावा लागेल.

(डॉ. जि. एम. हुलसुरे)
सहआयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे

Scanned with OKEN Scanner